# तडवळकर यांच्यासह नऊ जणांची स्वीकृत सदस्यपदी वर्णी

## भाजपच्या ८, एमआयएमच्या एका सदस्याचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या शुक्रवारी झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत सदस्यपदी 'भाजपा'च्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह एकूण ९ जणांची नियुक्ती करण्यात आली.

महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी डायसवर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, नगरसचिव प्रवीण दंतकाळे उपस्थित होते. महापालिकेत स्वीकृत सदस्यपदाच्या एकूण १० जागा आहेत. त्यानुसार १० सदस्यांची नियुक्ती करण्याचा



प्रशासकीय प्रस्ताव महापालिका सर्वसाधारण सभेपुढे होता. पक्षीय बलाबलनुसार भाजपच्या वाट्याला नऊ तर एमआयएमला एक जागा होती. भाजपाने नऊपैकी केवळ आठ सदस्यांची नियुक्ती केली. यामध्ये रोहिणी तडवळकर, अक्षय अंजीखाने, वृषाली चालुक्य, मनीष केत, श्रीनिवास दायमा, ऋषिकेश मेट्रे, रुद्रमणी बोरामणी, ज्ञानेश्वर म्याकल यांचा समावेश आहे. भाजपाच्या कोट्यातील शिल्लक असलेल्या एका जागेची नियुक्ती पुढील सभेत केली जाईल, असे सांगण्यात आले. दरम्यान, आजच्या सभेत भाजपातर्फे ८ स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी मांडला. या सभेत एमआयएमकडून गटनेत्या वहिदा भंडाले-शेख यांनी नय्युम सालार यांच्या नियुक्तीची सूचना मांडली. या सर्व नऊ सदस्यांच्या प्रस्तावाला सभेने मान्यता दिली.

### केत यांच्या रुपाने पत्रकाराला संधी

भाजपच्या कोट्यातून पत्रकार मनीष केत यांना स्वीकृत सदस्य पदाची संधी देण्यात आली आहे. केत हे अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात असून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. या संघाच्या माध्यमातून त्यांनी राज्यातील पत्रकारांचे संघटन केले असून वेगवेगळे उपक्रम ते या माध्यमातून राबवितात.



सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत सदस्य निवडीच्या विषयावरुन विरोधी पक्षनेते व सत्ताधारी यांच्या गोंधळ झाला. या गोंधळामुळे महापौर विनायक कोंड्याल यांनी आजची सभा तहकूब केली.



सभा तहकूब न करता चालूच ठेवावी, असे सांगत विरोधी पक्षनेत्यांनी महापौरांना घेरले होते.



स्वीकृत सदस्यांसह त्यांच्या समर्थकांनी सभागृहाबाहेर जल्लोष केला.



नगरसचिव स्वीकृत सदस्यांची नावे वाचताना सभागृहात असा गोंधळ झाला.

## स्थायी समिती : भाजपाच्या १४, एमआयएम, शिवसेनेच्या प्रत्येकी एका सदस्याची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांची नियुक्ती शुक्रवारी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही नियुक्ती करण्यात आली. पक्षीय बलाबलनुसार भाजपाकडून १४, एमआयएम आणि शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्यावतीने प्रत्येकी एका सदस्याची नियुक्ती करण्यात आली.

भारतीय जनता पार्टीने अविनाश पाटील, रंजीता चाकोते, संगीता जाधव, अमर पुदाले, बिज्जू प्रधाने, गणेश वानकर, जयकुमार माने, सतीश सिरसिल्ला, कल्पना कदम, अश्विनी चव्हाण, सत्यनारायण गुर्रम, भारतसिंग बडूरवाले, शिवाजी वाघमोडे, राजकुमार पाटील यांची वर्णी लावली आहे. एमआयएमकडून अझहर हुंडेकरी शिवसेनेकडून अमोल शिंदे यांना संधी देण्यात आली. शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या महापालिका सभेत भाजपाच्या नावांची सूचना सभागृह नेते नरेंद्र काळे, एमआयएम च्या नावाची सूचना गटनेत्या वहिदा भंडाले-शेख तर शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या नावाची सूचना गटनेते अमोल शिंदे यांनी मांडली. सभेत महापौरांनी या नावांना एकमताने मंजुरी दिली.



## पत्रकार माझे कान आणि डोळे; समाजाचे प्रश्न प्राधान्याने मांडणार : मनीष केत

### सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

आयुष्याच्या शेवटपर्यंत पत्रकारिता करणार असून पत्रकार बांधव माझे कान आणि डोळे राहतील. सभागृहात समाजाचे प्रश्न प्राधान्याने मांडणार आहे, अशी ग्वाही नूतन स्वीकृत नगरसेवक मनीष केत यांनी दिली. सोलापूर महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी त्यांची निवड झाल्याबद्दल श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित सत्कारादाखल उत्तर देताना बोलत होते.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांच्या हस्ते नूतन नगरसेवक मनीष केत यांचा सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर सागर सुरवसे, किरण बनसोडे, अभिषेक आदेप्पा, प्रमोद बोडके, प्रशांत बडवे आदी उपस्थित होते. श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहासमोर ढोलताशाच्या गजरात गुलालाची मुक्त उधळण करत जल्लोष करण्यात आला. श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांनी मनीष केत यांच्या कार्याचा गुणगौरव करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विश्वभूषण लिमये यांनी सूत्रसंचालन केले. आफताब शेख यांनी आभार मानले.

# महापालिकेची पहिलीच सभा तहकूब करण्याची नामुष्की

- भाजपाने नऊ ऐवजी आठ सदस्यांची घोषणा केल्याने रणकंदन
- बहुमत असताना सत्ताधाऱ्यांना सभागृह चालवता येत नसल्याचा विरोधकांचा आरोप
- विरोधकांमध्ये एकजूट तर सत्ताधाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेची पहिलीच सभा तहकूब करण्याची नामुष्की आज भाजपावर ओढवली. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी नऊ ऐवजी आठच स्वीकृत सदस्याची घोषणा केल्यानंतर शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी आक्रमक भूमिका घेतली. नवा पायंडा पाडू नका, बेकायदेशीर काम करु नका, असे म्हणत कडाडून विरोध केला. यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या गोंधळातच दुखवटा प्रस्ताव मांडत महापौर विनायक कोंड्याल यांनी सभा तहकूब करत असल्याची घोषणा केली.

तेव्हा विरोधकांनी तीव्र शब्दात निषेध नोंदवत पळ काढणाऱ्या महापौराचा धिक्कार असो अशा घोषणा दिल्या. शिवसेना शिंदे गट, काँग्रेस आणि एमआयएमच्या सदस्यांनी थेट डायसवर जावून प्रचंड घोषणाबाजी करत महापौरांना जणू घेराव घातला. महापौर निवडीनंतरची सोलापूर महापालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा शुक्रवारी सकाळी ११ वाजता महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. मात्र ११.१५ वाजले तरी नगरसचिवांसह महापौर, उपमहापौर आणि आयुक्त सभागृहात आले नव्हते. यामुळे शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी नगरसचिव ११.१५ वाजले. पाच मिनिटात सभागृहात या अन्यथा तुम्ही जिथे असाल तिथे आम्ही येऊ. आयुक्त महापालिकेत आहेत का? हॉटेल बालाजी सरोवरवर मीटिंग सुरु आहे का? वाटाघाटीला वेळ पुरला नसेल तर संध्याकाळी सभा बोलवायची होती? पूर्वी पालिकेला आणि आता हॉटेलला महत्व आले आहे, असे टोलेबाजी केली.

अखेर सकाळी ११:२५ मिनिटांनी सभेस सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहून कामकाज सुरु करुया, अशी सूचना सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी मांडली. काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी विषय पत्रिकेनुसार आधी निवडी होऊ द्या, अशी सूचना केली. ११.२८ वाजता सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी विषय क्रमांक दोन, चार, पाच, सहा, सात आणि तीन प्राधान्याने विषय प्राधान्य क्रमानुसार सभापटलावर मांडले. त्यावर अमोल शिंदे यांनी विषय क्रमांक तीन शेवट का? तुमच्या वाटाघाटी झाल्या नाहीत का? असा सवाल उपस्थित केला. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी स्थायी समितीसाठी भाजपाच्या १४ सदस्यांची नावे जाहीर केली. एमआयएमच्या गटनेत्या वहिदा शेख आणि शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी प्रत्येकी एका सदस्याची घोषणा केली. हा विषय एकमताने मंजूर करण्यात आला. स्वीकृत सदस्यत्व संदर्भात विषय क्रमांक ४ सभापटलावर आला. सभागृह नेते काळे यांनी भाजपाच्या नऊपैकी आठ स्वीकृत सदस्यांची नावे वाचून दाखविली. एमआयएमच्या गटनेत्या वहिदा शेख यांनी नईम सालार यांच्या नावाची घोषणा केली. एकमताने या विषयास मान्यता देण्यात आली.

दरम्यान, स्वीकृत सदस्य संधी मिळाली नसल्याने भाजपच्या एका कार्यकर्त्याने पदाधिकाऱ्याच्या नावे चिठ्ठी लिहून आत्महत्या करणार असल्याचा मेसेज आला आहे. यावेळी शिंदे सेनेचे अमोल शिंदे हे डायस समोर आल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

पुढील सभेत निर्णय घेण्याचा अधिकार महापौर यांना असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. नूतन स्वीकृत सदस्या तथा भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर ह्या महापौरांच्या मदतीला धावून येत दुखवटा प्रस्ताव मांडून सभा तहकूब करण्याची सूचना केली. महापौर कोंड्याल यांनी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहून दुःखवटा प्रस्तावासह ही सभा तहकूब करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

### सत्ताधारी भाजपाला सभागृह चालवता आले नाही ही मोठी नामुष्की : शिंदे

घाई घाईत महापौर सभागृहाबाहेर गेले. त्याचदरम्यान अमोल शिंदे आणि चेतन नरोटे यांच्यासह एमआयएमचे सदस्यही डायसच्या दिशेने वर आले. प्रचंड बहुमत असतानाही सत्ताधारी भाजपाला सभागृह चालवता आले नाही. ही मोठी नामुष्की आहे. पहिली सभा कलंकित झाली. सत्ताधारी पळपुटे आहेत. महापौरांना सभागृह चालवता आले नाही असा आरोप करत विरोधकांनी निषेध व्यक्त केला तसेच धिक्काराच्या घोषणा दिल्या. आता हॉटेलमध्ये सभा चालवली जाईल असाही आरोप अमोल शिंदे यांनी केला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगरसेवक वैभव हत्तूरे यांना भाजपाने २५ लाख रुपये देऊन युतीत आणले असा घणघाती आरोपी अमोल शिंदे यांनी केला. एमआयएम गटनेत्या वहिदा शेख आणि अझहर हुंडेकरी यांनी सभा तहकूब केल्याबद्दल निषेध नोंदवला. रमजानच्या महिन्यात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याचा आरोप करत याकडे सभागृहात दुर्लक्ष करण्यात आरोपी त्यांनी यावेळी केला. दरम्यान, बी २ उठवण्यासंदर्भातील विषयावर झालेल्या चर्चेत संजय कोळी, विनोद भोसले, रोहिणी तडवळकर, एमआयएमच्या वहिदा शेख, अजहर शेख, शिवसेनेचे अमोल शिंदे आणि काँग्रेसचे चेतन नरोटे यांनी सहभाग नोंदवला. विविध प्रश्न उपस्थित केले.

### भाजप नगरसेविका श्रध्दा पवार यांच्या प्रश्नामुळे संतापाची लाट

भाजपच्या नगरसेविका श्रद्धा पवार यांनी नगर सचिव कार्यालयात मी प्रस्ताव देण्यासाठी गेले होते मात्र नगरसचिवांनी तो स्वीकारला नाही असा आरोप केला. माझा प्रस्ताव नाकारला असताना इतर प्रस्ताव कसे काय सगळे पुढे आले असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर भाजपचे अनंत जाधव यांनी नगरसचिव हे खरे आहे का असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर नगरसचिवांनी दिलेल्या उत्तरावर संताप व्यक्त करण्यात आला. नगरसचिव खोटे बोलत आहेत असा आरोप चेतन नरोटे यांनी केला. ओळखत नाही असा शब्दप्रयोग केल्याने नगरसेवचिवांनी माफी मागावी अशी मागणी अनंत जाधव, अमोल शिंदे आणि चेतन नरोटे यांनी केली. त्यावर मी तसे बोललोच नाही असे स्पष्टीकरण नगरसचिव दंतकाळे यांनी दिले. महिला सदस्यांचा सन्मान राखला पाहिजे अशी मागणी विरोधकांनी केली. अखेर महापौर विनायक कोंड्याल यांनी सर्व नगरसेवकांचे प्रस्ताव घ्यावेत , असे आदेश दिले.

### बी २ उठविण्यासंदर्भात सभासद प्रस्तावास एकमताने मान्यता

सोलापूर महापालिकेचे सदस्य विनोद भोसले, सिध्देश्वर कमटम, विजया खरात यांनी सोलापूर शहरातील विविध परिसरातील मिळकतींवर असलेल्या बी २ संदर्भात २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सभासद प्रस्ताव ठेवला. त्यावर चर्चा झाली. बी २ (सत्ता प्रकार) उठवण्याकरिता राज्य शासनास विनंती करण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव हा पाठविण्यात आला. या सभेपुढे विनोद भोसले यांनी यावर भाष्य केले. संबंधित मिळकतींवर बी-२ (सत्ता प्रकार) असल्यामुळे खरेदी-विक्री बंद आहे. या ठिकाणी बांधकाम परवाने मिळत नसल्याकारणाने महानगरपालिकेच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत आहे. महापालिकेस मिळणारे उत्पन्न ठप्प झाले आहे. बी-२ (सत्ता प्रकार) उठल्यास, नियमितपणे व्यवहार सुरू होतील, संबंधित चाळी असतील त्यांना स्वतः चा मालकी हक्क मिळण्यास मदत होईल तसेच शासनाचा भरीव असा १ टक्के महसूल महानगरपालिकेस प्राप्त होईल व महानगरपालिकेस मिळकत कराच्या माध्यमातून भरीव असे उत्पन्न मिळेल. असे नमूद करण्यात आले. अनेक चाळी ज्या जीर्ण अवस्थेमध्ये आहेत, त्यांना बी २ (सत्ता प्रकार) रद्द होऊन मालकी हक्क मिळाल्यास या ठिकाणी भविष्यामध्ये पुनर्विकास करण्यास मदत होईल.

### श्रीदेवी फुलारे यांनी वेधले बेकायदा बांधकामांकडे लक्ष

बी २ उठवण्यासंदर्भातील विषयावर चर्चा सुरू असतानाच भाजपच्या नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी शहरातील बेकायदा इमारत बांधकामांकडे लक्ष वेधले. बेकायदा इमारतीला परवानगी दिली का ? यामध्ये अधिकारी सामील झाले आहेत. भ्रष्टाचार झाला आहे. टक्केवारी घेतली जाते. यासंदर्भात महापालिका आयुक्तांनी खुलासा करावा. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी फुलारे यांनी केली. यावर बांधकाम परवाना विभागाचे उपअभियंता नीलकंठ मठपती यांनी खुलासा केला. यावेळी शिवानंद पाटील यांनी चर्चेत सहभाग नोंदवला. याचवेळी एम आयएमचे अजहर शेख यांनी प्रॉपर्टी कार्ड संदर्भात सूचना मांडली. दरम्यान, यामध्ये हस्तक्षेप करत सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी विषयांतर होत आहे. विषय वेगळा आहे असे सांगत याकडे लक्ष वेधले.

### मला पैसे दिल्याचा आरोप खोटा : हत्तुरे



महापालिकेत भाजपशी युती करण्यासाठी २५ लाख रुपये मला देण्यात आले, हा विरोधकांचा आरोप खोटा आहे, असा खुलासा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे महापालिकेतील एकमेव नगरसेवक वैभव हत्तुरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना केला. महापालिकेत भाजप समवेत युती करण्याचा विषय हा प्रदेश स्तरावर दोन्ही पक्षाकडून निश्चित झाला. आमच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मान्यता दिल्यावर युतीचा निर्णय झाला. मला जर पैसे देण्यात आले असेल तर ते विरोधकांनी सिद्ध करून दाखवावे, असे आव्हान यावेळी वैभव हत्तुरे यांनी दिले.

### माझी उमेदवारी ऐनवेळी डावलली : किसन घोडके

महापालिका स्वीकृत नगरसेवक पदासाठी माझे नाव भाजपकडून निश्चित करण्यात आले होते पण स्थानिक पक्षांतर्गत राजकारणामुळे ऐनवेळी मला डावलण्यात आले, असा आरोप भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते किसन घोडके यांनी केला. आजपर्यंत आपण पक्षाचे एकनिष्ठपणे काम करत आलो आहोत. महापालिका निवडणुकीसाठी मी अनेकदा उमेदवारी मागितली, पण मला ती देण्यात आली नाही. आता स्वीकृत सदस्य पदी मला संधी देण्यात येत होती, पण अंतर्गत राजकारणामुळे मला डावलण्यात आले आहे, असे घोडके म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३६२

**तैसी खवळे चाड । होय दु:खासकट गोड ।**
**इंद्रश्रीहि सांकड । गमों लागे ।।**

सत्व, रज, तम या तीन गुणांपैकी सत्व या गुणाचे भगवंतांनी आतापर्यंत स्पष्टीकरण केले आहे. आता भगवंत रज या गुणांबद्दल बोलत आहेत. जीवाला विषयात रंगवुन टाकण्याचे काम रज हा गुण करीत असतो. रज हा अभीलाशाच्या तारूण्याने सदासर्वकाळ तरूणच राहतो. रज जेव्हा शरीरात प्रवेश करतो तेव्हा जीव कामाच्या मस्तीत येवुन तो विषयाच्या चिंतनरुपी वाऱ्यावर स्वार होतो. विषयाचे सतत चिंतन करून धावत राहण्याचे काम सुरू होते. विषय वासना रजामुळे प्रचंड खवळते. खरे म्हणजे विषयात प्रचंड दु:ख असते. विषय माणसाला सुखी ठेवतच नाहीत. विषयाची हाव पुरविण्यासाठी माणसाला अनेक दु:खाना सामोरे जावे लागते.



तरी पण विषयप्राप्तीच्या तीव्र इच्छेमुळे दु:खही गोड वाटु लागते. विषयसक्तीमुळे इंद्राची संपुर्ण संपत्ती मिळाली तरी ती थोडीच आहे, असे वाटु लागते. हे सांगतांना भगवंत म्हणाले, तैसी खवळे चाड । होय दु:खासकट गोड । इंद्रश्रीहि सांकड । गमों लागे ।। अर्थात, सुखभोगाची ईच्छा जेव्हा वाढत जाते, तेव्हा काहीही प्राप्त झाले व कितीही प्राप्त झाले तरी ते कमीच वाटु लागते. प्राप्त झाले त्यापेक्षा जास्त प्राप्त करण्यासाठी जीव वाट्टेल ते करण्याची तयारी ठेवतो. जवळ असलेले पुर्ण खर्चुन गेले तर उद्या काय करावे? असा प्रश्न मनात आणुन जीव आणखी जास्त प्राप्त करण्यासाठी सतत धडपडत असतो. सुखोपभोगासाठी व्रत, वैकल्ये, करण्याचेही तो सोडत नाही. जगात आपणांला कीर्ती मिळावी म्हणुन विहीरी, तळे, बागा, धर्मशाळा बांधण्याचे कामे तो करतो. या कार्यामागे त्याचा हेतु पुर्णत: कीर्ती मिळावी असा असतो. जनहितार्थ कार्य करून मुक्त व्हावे, या कर्मात आपण लिंपु नये असे त्याला अजीबात वाटत नाही. य कितीर्मुळे आपणांला भविष्यात कसा आणि फायदा करून घेता येईल याचा तो सातत्याने विचार करतो. विहिरी, तळे, धर्मशाळा इत्यादी बांधण्याच्या सात्वीक, सामाजिक कार्यात जीव मीपणाला स्थान देतो हे चुकीचे आहे. नि:स्वार्थ भावनेने हे कार्य करायला हवे.

रजोगुणी माणसाचा चपळपणा, चंचलपणा इतका असतो कि, त्याचापुढे माशाचा चंचलपणाही फिका पडतो. कामिनी स्त्रीच्या नेत्रकटाक्षापेक्षाही याचा चंचलपणा, नेत्रकटाक्षापणा अधिक असतो. याच्या चपळतेपुढे विजेचा चपळपणाही फिका पडतो. ऐहिक आणि पारलौकीक विषयांच्या लालसेने रजोगुणी माणुस क्रियाकर्मांतराच्या आगीत उड्या घेत असतो. खरे म्हणजे देहधारी जीवात्मा या देहापासुन वेगळा असतानाही वासनांच्या, विषयांच्या बेड्यात तो जखडला गेल्याने तो आत्मसुख विसरून बाह्यसुखातच लोळत राहतो. विषयांच्या बेड्यात तो जखडला गेल्याने तो आत्मसुख विसरून बाह्यसुखातच लोळत राहतो. विषयाच्या भोगांची त्याची इच्छा शेवटपर्यंत अपुर्णच राहते. कारण जसजसे विषय भोगावेत तसे-तसे विषय भोगाची इच्छा वाढतच जाते. वाढती इच्छा पुर्ण करणे या देहाला कधीही शक्य नसते. या देहात बुध्दी नावाची मोठी शक्ती उपलब्ध असतानांही माणुस या बुध्दीला विषयात अडकवुन ठेवतो. माणसाने या बुध्दीला जर आत्मसुखाकडे वळवीले तर त्याच्या हातुन चुकीचे काही घडणार नाही. विषयसुख हे नाशवंत आहे आणि आत्मसुख शाश्वत आहे, याची जाण ठेवुन माणसाने वागण्याचा विचार करावा. माऊलीकृपेने आपण विषयसुखाकडे न वळता आत्मसुखाकडेच वळावे अशी अपेक्षा. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. २१ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. चतुर्थी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- रेवती (१९.०६)**
**योग - शुभ (१५.५०)**
**करण - बसव (२४.०७)**
**राहू काल :**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

**दिनविशेष : १९९९: भारत आणि पाकिस्तान यांच्यात मैत्रीपूर्ण संबंधांसाठी 'लाहोर घोषणापत्र' स्वाक्षरी करण्यात आली. १९५२: बांगलादेशात (तेव्हाचा पूर्व पाकिस्तान) मातृभाषा बंगाली असावी म्हणून आंदोलक हुतात्मे झाले, याच बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस जागतिक स्तरावर मातृभाषा दिन म्हणून पाळला जातो. २१ फेब्रुवारी हा दिनविशेष भाषिक अभिमान आणि ऐतिहासिक घटनांचा दुवा साधतो.**

# सोलापुरातून धावणार 'सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर'

## आठ हजार कोटींची निविदा जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

केंद्र सरकारच्या स्थगिती आदेशामुळे मागील दोन वर्षांपासून रखडलेले सुरतचेन्नई ग्रीन कॉरिडॉर प्रकल्पाचे काम आता मिशन मोडवर सुरू झाले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महत्त्वाकांक्षी कॉरिडॉरसाठी तब्बल ८ हजार कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली असून, पुढील अडीच ते तीन वर्षांत काम पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. निविदा प्रक्रियेला वेग देतानाच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून रखडलेले भूसंपादनही पुन्हा सुरू करण्यात आल्याची माहिती उप जिल्हाधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या चार तालुक्यांतील ५८ गावांमधून हा महामार्ग जाणार आहे. जिल्ह्यात एकूण १०५६ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून, फेब्रुवारी २०२५ पूर्वीच ५६० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. त्यासाठी सुमारे ४३२ कोटी रुपयांचा मोबदला शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला आहे. उर्वरित ५०७ हेक्टर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सध्या सुरू असून, दोन दिवसांत ५० शेतकऱ्यांच्या जमिनीचे व्यवहार पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### २२० किमीचा सोलापूर-अहिल्यानगर टप्पा

सोलापूर ते अहिल्यानगरदरम्यान सुमारे २२० किलोमीटर लांबीचा हा टप्पा असणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील या महामार्गाची लांबी ८० किलोमीटर इतकी असेल. राज्यात नाशिक, अहिल्यानगर, बीड आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतून सुमारे ५१३ किलोमीटरचा मार्ग जाणार आहे. या कॉरिडॉरमुळे राज्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, औद्योगिक आणि व्यापारी हालचालींनाही मोठी चालना मिळणार आहे.शेतकऱ्यांचा रोष टाळण्यासाठी निवडणुकीनंतर निर्णय या प्रकल्पासाठी जमिनी देण्यास अनेक भागांतील शेतकऱ्यांचा सुरुवातीला विरोध होता. 'समृद्धी महामार्गा'प्रमाणेच मोबदला देण्याची मागणी करण्यात येत होती. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने प्रक्रिया काही काळ थांबवली होती. सर्व निवडणुका पार पडताच शासनाने पुन्हा या प्रकल्पाला गती दिली आहे.

### प्रवास वेळेत मोठी बचत

सोलापूर ते तिरुपती हे अंतर सध्या रस्त्याने पार करण्यास सुमारे १४ तास ४२ मिनिटे लागतात. नवीन ग्रीन कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर हेच ७४७ किलोमीटरचे अंतर अवघ्या ९ तासांत पूर्ण करता येणार आहे. म्हणजेच सुमारे ६ तासांची बचत होणार आहे. त्यामुळे प्रवाशांसह मालवाहतुकीलाही मोठा फायदा होणार आहे.



### तीन वर्षांत पूर्णत्वाचा संकल्प

निविदा प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून शासनाची अंतिम मंजुरी मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. भूसंपादन, मोबदला वितरण आणि तांत्रिक प्रक्रिया समांतर राबवण्यात येत आहेत. पुढील तीन वर्षांत हा बहुप्रतीक्षित ग्रीन कॉरिडॉर पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्याचा प्रशासनाचा मानस आहे.सुरतचेन्नई ग्रीन कॉरिडॉरमुळे सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार, यात शंका नाही.

# 'शिवचरित्रातून धाडस, शूरपणा हे गुण आत्मसात केले पाहिजे'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सतराव्या शतकात महाराष्ट्राची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. शिवरायांनी अटकेपार झेंडा रोवला होता. स्वराज्याचे तोरण बांधताना जिवाभावाचे मावळे गोळा केले होते. शिवचरित्रातून धाडस, शूरपणा गुण आत्मसात केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा.विकास शिंदे यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर स्वराज्य रक्षक संभाजी महाराज अध्यासन केंद्र व छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आर्टस् ॲन्ड कॉमर्स-सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.युवराज सुरवसे यांनी वक्त्याचे परिचय करुन दिले. प्रा.सोनकांबळे यांनी आभार मानले.



यावेळी प्र. कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, ज्ञानेश्वर सपाटे, प्रा.वीरभद्र दंडे, प्रा.अनिल घनवट, प्रा.सचिन गायकवाड, प्रा.नेताजी कोकाटे, महेश माने, शिवदास चटके, अशोक चव्हाण, नागनाथ नवगिरे, प्राचार्य मधुकर पवार, दत्ता भोसले, सुजाता जुगदार, मंजुश्री पाटील, उषा गोखले, माधवी कांबळे उपस्थित होते.

# ७७७ महिलांनी पूर्ण केले मोफत कौशल्य प्रशिक्षण

## महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने महिलां व मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर व शिवणकाम प्रशिक्षण उपक्रमास यंदा भरघोस प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचा सांगता समारंभ बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिरात उत्साहात पार पडला.

यंदा एकूण ७७७ महिलांनी व मुलींनी प्रशिक्षण पूर्ण केले. त्यापैकी ५३५ जणींनी ब्युटी पार्लर व्यवसायाचे तर २४२ जणींनी शिवणकामाचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्वांना यावेळी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, महेश देवकर , यशोधरा स्किल अकॅडमीचे सागर हिरेहब्बू, सोनाली हिरेहब्बू, लिपिक श्रीनिवास पेंद्टी, नितीन मुंढे, समूह संघटक ऋषिकेश लोखंडे तसेच मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सांगता समारंभात शिवणकाम प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या कपड्यांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले होते. ब्युटी पार्लर प्रशिक्षण घेतलेल्या काही प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष शृंगार सादर करून आपल्या कौशल्याचे प्रात्यक्षिक दाखवले.

अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी प्रदर्शनातील वस्त्रनिर्मिती आणि डिझाईन्सचे कौतुक करत सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे गरजेचे असून, कुटुंबाला हातभार लावण्याबरोबरच स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी, असा सल्ला त्यांनी दिला. महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांचे कौतुक करण्यात आले. यशोधरा स्किल अकॅडमीचे सागर हिरेहब्बू व सोनाली हिरेहब्बू यांचे अभिनंदन करण्यात आले.



### महिलांनी स्वावलंबी बनून स्वतःचा व्यवसाय उभारावा : उपमहापौर देवकर

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी महिलांनी स्वावलंबी बनून स्वतःचा व्यवसाय उभारावा, असे आवाहन केले. व्यवसाय सुरू करण्यासाठी महापालिका सदैव पाठीशी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांनी भविष्यात यापेक्षा अधिक प्रतिसाद मिळाल्यास ॲडव्हान्स लेव्हलचे प्रशिक्षणही आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

# संत केतेश्वर महाराज हे बुरुड समाजाला प्रेरणादायी

## माजी मंत्री चंद्रकांत खैरे ; प्रकाश पळसे यांच्या मेदारवाणी पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

बाराव्या शतकात होऊन गेलेले बुरुड समाजाचे महान संत केतेश्वर महाराज हे समतानायक व लोकशाहीवादी होते,त्यांचे विचार हे आजही बुरुड समाजासह सर्वांना प्रेरणादायी आहेत,असे प्रतिपादन माजी मंत्री व माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

सांगली येथील सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक प्रकाश पळसे लिखित मेदारवाणी या पुस्तकाचे प्रकाशन खैरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.



सांगली येथील डेक्कन सभागृहात झालेल्या कार्यक्रमास व्यासपीठावर बुरुड समाजाचे जगद्गुरु व महामंडलेश्वर सुरेश नागेश्वर महाराज, बुरुड समाजाचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, दलितमित्र पांडुरंग करपे, महिला आघाडीच्या नेत्या मेनका कोरडे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतिले, नगरसेविका मनिषा कुकडे, माजी नगरसेवक मनोज कुकडे तसेच लेखक श्री.प्रकाश पळसे व त्यांच्या पत्नी नंदा पळसे आदी उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते संत केतेश्वरांच्या मूर्तीचे व सुरी कोयत्याचे पूजन करण्यात आले. स्ताविक प्रकाश पळसे यांनी केले. सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले व स्नेहल शिर्के यांनी केले. विशेष म्हणजे याच कार्यक्रमात प्रकाशजी पळसे यांची एकसष्टी साजरी करण्यात आली.त्यांचा सहपत्निक सत्कार करण्यात आला व मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापण्यात आला. श्रीकांत कुकडे यांनी संत केतेश्वर यांचा सजीव देखावा सादर केला होता.

# सोलापूर विद्यापीठाचे डिजिटल पाऊल

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने स्वतःचे डाटा सेंटर सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, त्यासाठी सहा कोटी रुपयांची भरीव तरतूदही विद्यापीठाने आपल्या अर्थसंकल्पात केली आहे. डिजिटल क्रांतीच्या युगात हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि अनिवार्य मानला जात आहे.

डाटा सेंटरमुळे होणारा ऊर्जेचा प्रचंड वापर ही सध्या जागतिक स्तरावर चिंतेची बाब आहे. या पार्श्वभूमीवर, ग्रीन डाटा सेंटर (सौर ऊर्जेवर चालणारे) ही संकल्पना वेगाने लोकप्रिय होत आहे. सोलापूर विद्यापीठ भविष्यातील ऊर्जेची गरज आणि पर्यावरण पूरकतेचा विचार करून अशा पर्यायांचा विचार करेल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सेंटर फॉर इन्फॉर्मेशन अँड नेटवर्क सिक्युरिटीसह प्रगत संगणक सुविधा उपलब्ध आहेत. तमिळनाडूतील अण्णा विद्यापीठाचे स्वतःचे भव्य डाटा सेंटर कार्यरत आहे. या विद्यापीठांमधील सुपरकॉम्प्युटिंग किंवा डाटा सेंटर्स हे सी-डॅकच्या मदतीने उभारले जातात. नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन अंतर्गत अनेक ठिकाणी हाय-टेक डाटा सेंटर्स उभारली जात आहेत.

### काय आहेत डाटा सेंटरचे फायदे

आधुनिक डिजिटल जगाचा मेंदू मानल्या जाणाऱ्या या सेंटरचे अनेक फायदे आहेत.

**शैक्षणिक उपयोग:** डिजिटल लायब्ररी, विद्यार्थ्यांचा डेटा साठवणे, एआय आणि मशीन लर्निंगच्या प्रगत शिक्षणासाठी याचा उपयोग होईल.

**माहिती सुरक्षा:** यात प्रगत फायरवॉल, एन्क्रिप्शन आणि सुरक्षा यंत्रणा असते, ज्यामुळे सायबर हल्ल्यांपासून संरक्षण मिळते.

**बॅकअप सुविधा:** तांत्रिक बिघाड झाल्यास माहितीचा बॅकअप उपलब्ध असतो, ज्यामुळे महत्त्वाची माहिती कायमस्वरूपी सुरक्षित राहते.

**किफायतशीर पर्याय:** स्वतःचे स्वतंत्र सर्व्हर उभारण्यापेक्षा डाटा सेंटरची जागा किंवा क्लाउड वापरणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे असते.

**अखंड सेवा:** वीजपुरवठा खंडित झाल्यासही जनरेटर आणि युपीएसच्या सोयीमुळे इंटरनेट व सर्व्हर सेवा अखंडित सुरू राहतात.

### मानद पदवीचा अधिकार कुलगुरूंचा की अधिसभेचा?

विद्यापीठाच्या अधिसभेने (सिनेट) ठराव मंजूर केला असला, तरी डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एससी.) आणि डॉक्टर ऑफ लिटरेचर (डी.लीट.) या मानद पदव्यांची शिफारस करण्याचा अंतिम अधिकार कुलगुरूंचाच असल्याचे ठाम मत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी नुकत्याच झालेल्या अधिसभेत व्यक्त केले.

अधिसभेने नुकतेच दोन दिग्गज व्यक्तिमत्त्वांना मानद पदवी देण्याचे ठराव सर्वानुमते मंजूर केले आहेत. पद्मभूषण प्रा. जे. बी. जोशी यांना डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एससी.) आणि पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना डॉक्टर ऑफ लिटरेचरचा (डी.लीट.) हे दोन्ही प्रस्ताव कुलगुरूंनी राज्यपाल तथा कुलपतींच्या मंजुरीसाठी पाठवले होते.

राज्यपालांच्या प्राथमिक संमतीनंतर व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेने यावर शिक्कामोर्तब केले असून, आगामी दीक्षांत समारंभात या पदव्या प्रदान केल्या जातील.




**विद्यापीठातून...**
**अजितकुमार संगवे**
**मो. 9881133103**

### प्रलंबित प्रस्तावांवरून प्रश्नचिन्ह

या बैठकीत काही जुन्या प्रस्तावांचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे (मरणोत्तर), केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना डी.लीट. पदवी देण्याबाबतचा ठराव अधिसभा व व्यवस्थापन परिषदेने यापूर्वीच मंजूर केला होता.

या प्रस्तावांचे काय झाले, असा प्रश्न सदस्यांनी विचारला असता, कुलगुरू प्रा. महानवर यांनी स्पष्ट केले की, हे सर्व प्रस्ताव राज्यपाल कार्यालयाकडे पाठवले होते, परंतु तिथून अद्याप मंजुरी मिळालेली नाही. कुलगुरूंनी हे प्रस्ताव पुढील वर्षी पुन्हा पाठवण्याचे आश्वासन दिले, मात्र "मी याबाबत कोणतीही कमिटमेंट (वचन) देत नाही" असे ठामपणे सांगितले. कुलगुरूंचे हे वक्तव्य अधिसभा आणि व्यवस्थापन परिषदेच्या ठरावांच्या अधिकारावर गदा आणणारे असल्याचे मत काही सदस्यांनी व्यक्त केले आहे.

विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा ही सर्वोच्च मानली जाते. याचे उदाहरण देताना संबंधित सदस्यांनी माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या काळातील दोन घटनांची आठवण करून दिली. विद्यापीठाचे बजेट नामंजूर करणे आणि प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांना डी.लीट. देण्याचा प्रस्ताव फेटाळणे.

अधिसभेने यापूर्वी आपले सर्वोच्चपण सिद्ध केले असल्याने, कुलगुरू महोदयांनी किमान पुढील वर्षी तरी प्रलंबित नावांचे फेरप्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावेत, अशी अपेक्षा संबंधित सदस्यांकडून व्यक्त केली जात आहे.


# कृषी यांत्रिकीकरणासाठी ८,१९६ शेतकरी प्रतिक्षेत

## चार कोटींचे वाटप पूर्ण; ८६ कोटींचे अनुदान रखडले : जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याची प्रक्रिया सुरू असली, तरी मोठ्या प्रमाणावर अनुदान रखडल्याने हजारो लाभार्थी प्रतीक्षेत आहेत. जिल्ह्याला प्राप्त झालेल्या चार कोटी रुपयांच्या निधीतून ३२९ शेतकऱ्यांच्या खात्यांवर अनुदान जमा करण्यात आले आहे. मात्र, यंत्रांची खरेदी करून बिले सादर केलेल्या एकूण ८,१९६ शेतकऱ्यांसाठी तब्बल ८६ कोटी ३० लाख ८९ हजार ६०८ रुपयांची आवश्यकता अद्याप बाकी असल्याची माहिती सोलापूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातून ट्रॅक्टरसह विविध कृषी अवजारांसाठी एक लाख ९६ हजार ३३५ शेतकऱ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी केवळ ट्रॅक्टरसाठी ७७ हजार ७७३ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली होती. विविध योजनांतर्गत एकूण ४२ हजार अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली. मात्र, डिसेंबर २०२५ पासून राज्य सरकारने महाडीबीटी पोर्टलवर पूर्वसंमती देणे तात्पुरते बंद केल्याने नव्याने खरेदी प्रक्रिया थांबली आहे.कृषी विभागाने स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, पूर्वसंमती पत्र मिळाल्याशिवाय ट्रॅक्टर किंवा इतर यंत्रांची खरेदी करू नये. अन्यथा अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.



### योजनानिहाय स्थिती

राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ७,८७५ शेतकऱ्यांनी यंत्रांची खरेदी करून बिले सादर केली आहेत. त्यांच्या अनुदानासाठी ८३ कोटी ५५ लाख ३१ हजार ६१३ रुपयांची गरज आहे. तर उपअभियान कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ३२१ शेतकऱ्यांनी खरेदी केली असून, त्यांच्यासाठी २ कोटी ७५ लाख ५७ हजार ९९५ रुपये आवश्यक आहेत. अशा प्रकारे एकूण ८,१९६ शेतकऱ्यांचे ८६ कोटी ३० लाख ८९ हजार ६०८ रुपये अनुदान प्रलंबित आहे.

### चार कोटींचे तातडीने वितरण

जिल्ह्याला उपलब्ध झालेल्या चार कोटी रुपयांच्या निधीतून महाडीबीटी प्रणालीवर बिले सादर केलेल्या ३२९ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर थेट अनुदान जमा करण्यात आले आहे. हा निधी निवडलेल्या लाभार्थ्यांनाच वितरित करणे बंधनकारक असल्याने कृषी विभागाने तातडीने ही कार्यवाही पूर्ण केली.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले की, उर्वरित निधी राज्य शासनाकडून उपलब्ध झाल्यानंतर सर्व प्रलंबित शेतकऱ्यांच्या खात्यांवर अनुदान जमा केले जाईल.

### ५० कोटींच्या मंजुरीची प्रतीक्षा

जानेवारी महिन्यात राज्य सरकारने कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या अंमलबजावणीसाठी ५० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली होती. या निधीतून टप्प्याटप्प्याने जिल्ह्यांना वाटप होणार आहे. मात्र, सध्या उपलब्ध निधी अपुरा असल्याने हजारो शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी

यंत्रसामग्री खरेदीसाठी कर्ज काढून गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांमध्ये अनुदान रखडल्याने नाराजीचे वातावरण आहे. शेतीतील मजूरटंचाई आणि वाढते खर्च लक्षात घेता यांत्रिकीकरण हा पर्याय महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे.कृषी यांत्रिकीकरणामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास आणि खर्च कमी होण्यास मदत होते. मात्र, निधीअभावी योजना संथ गतीने राबवली जात असल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा अधांतरी राहिल्या आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जिल्ह्यात शिवजयंतीचा उत्साह



### संभाज ब्रिगेड, जेऊर

जेऊर (ता. करमाळा) येथे संभाजी ब्रिगेडच्यावतीने शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह सर्व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी आंध्र प्रदेशचे ग्रामविकास विभागातील सचिव बालाजी मंजुळे (भा.प्र.से) यांच्या हस्ते व आजी-माजी सैनिक यांच्या हस्ते कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी आजी-माजी सैनिक, वारकरी, जेष्ठ नागरिक, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी इयत्ता ७वी तील सिद्धी क्षीरसागर हिने बहारदार शैलीत विचार मांडले. यावेळी पारंपारिक पद्धतीने होणाऱ्या २८ फेब्रुवारीच्या मिरवणुकीस सर्व शिवप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. सागर साखरे यांनी सूत्रसंचालन केले.



### सैनिक स्कूल, कुर्डूवाडी

आदर्श सैनिक स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी किरण सुरवसे यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. दीपप्रज्वलन, प्रार्थना, वंदे मातरम्-आरती व पुष्पहार अर्पण करून शिवरायांना अभिवादन करण्यात आले. तुळजाभवानी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. मगन पंढरीनाथ सुरवसे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना छत्रपतींच्या आदर्शांचा अंगीकार करून जीवनात ध्येय, शिस्त आणि राष्ट्रसेवा जोपासण्याचे आवाहन केले. संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत सैनिक वृत्ती, नेतृत्वगुण आणि देशासाठी समर्पित भावनेचा संदेश दिला. कार्यक्रमासाठी इंजिनीयर पवार, डॉ. शुभांगी शिंदे, मोहन सुरवसे, दयानंद सुरवसे, आशा सुरवसे व वर्षा सुरवसे यांनी उपस्थिती लावली.



### दत्त व दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी

दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशाला बार्शी या दोन्ही शाळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्त प्राथमिक शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती संगीता काळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून श्रीकांत कुंभारे (मुख्याध्यापक), युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, अरुणा मठपती, ललिता चव्हाण, चंद्रकांत लोखंडे, शितल पाटील उपस्थित होतेछत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिम पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रांजल राजेंद्र थोरात (इ-५वी) हिने शिवगर्जना सादर केली. इयत्ता १ ली ते १० वी मधील ३८ विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन चरित्र व त्यांचे कार्य याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. इयत्ता ६ वी मधील विद्यार्थीनींनी दैवत छत्रपती या गीतावर तर इ. ८ वी मधील विद्यार्थीनींनी आस्ते कदम या गीतावर सुंदर समूह नृत्य सादर केली. सूत्रसंचालन चंद्रकांत लोखंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीकांत कुंभारे, संगीता काळे, अरुणा मठपती, युवराज जगताप, सुनील लंगोटे, मंगेश मोरे, ललिता चव्हाण, चंद्रकांत लोखंडे, शितल पाटील यांचे सहकार्य लाभले. मंगेश मोरे यांनी आभार मानले.



### फाटे ट्रॅक्टर शोरूम, कोर्टी

पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथील ज्योतिर्लिंग बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर शोरूम येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवछत्रपतींच्या मूर्तीचे पूजन अल्पसंख्यांक सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष गुलाब भाई मुलांनी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या सोहळ्याला ज्योतिर्लिंग बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष नागेश फाटे, डॉ. रमेश फाटे, शुभम फाटे, शशांक फाटे, संतोष पुणेकर, ओंकार कथले, बेबन आदमीले, विशाल धांडोरे, अनिल जाधव, ओंकार मासाळ, समाधान बागल, ऋषिकेश बागल, वसिम मुलानी, रमेश बेलकर, शरद थिटे, आनंद सकटे उपस्थित होते.



### नव चैतन्य बाल मंडळ, अक्कलकोट

मैंदर्गी रस्ता समर्थ पार्क येथील कै. बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान येथे नव चैतन्य बाल मंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी मेजर संदीप सलगरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर हिराकांत जामदार, विश्वनाथ सुतार, मनोज जाधव, गोपाळ गंवंडी, सुधाकर काशेट्टी, महेश बंदिछोडे वाय.पी. बिराजदार, सागर इंगळे, बालाजी हादेवे चन्ना स्वामी गजाभाऊ घाटगे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळाचे विश्वजित जाधव, प्रणव जाधव, ऋतुराज जामदार, शैर्य सुतार, प्रणव जाधव, सुदर्शन संतोष बिराजदार, सुरज बिराजदार, अभिरूप इंगळे, हर्ष हादवे, मंथन बिराजदार,

# 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने जिल्हा दणाणला

## पोवाडे, शिवगर्जना आणि प्रेरणादायी भाषणे; विद्यार्थ्यांनी जागवला शिवरायांचा इतिहास

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-

**जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे केली. तसेच, विविध पोवाडे आणि शिवगर्जना गीतांवर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजयंतीनिमित्त विविध शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात ठिकठिकाणी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. दीपप्रज्वलन, प्रार्थना, वंदे मातरम्-आरती व पुष्पहार अर्पण करून शिवरायांना अभिवादन करण्यात आले.**

अकलूज शहरात सर्वत्र भगवे झेंडे

शहरात शिवजयंती मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. सर्वत्र भगवे झेंडे गटागटाणे युवकांनी दिलेल्या घोषणा जय भवानी जय शिवाजी घोषणा युवकांनी आणलेल्या ज्योतीच्या आगमन यामुळे परिसर शिवमय झाला होता

छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मूर्ती, आकर्षक देखावे, मराठा आरमाराची झलक, किल्ल्यांची प्रतिकृती, भगवे झेंडे आणि ढोल-ताशांच्या गजरात संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. कारखाना स्थळावरील छत्रपतींच्या पुतळ्यास सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले शंकर नगर, अर्जुन नगर येथे शिवछत्रपती प्रतिष्ठान यांनी आकर्षक मूर्ती स्थापन करून महाराजांचे जयघोष केला तर स्वराज्य प्रतिष्ठानतर्फे आयोध्यातील राम मंदिरात व महाराजांची मूर्ती स्थापन केली होती मराठा व्यवसायिक कल्याणकारी संघाच्यावतीने विजय चौक येथे रक्तदान शिबीर घेतले तसेच शंकर नगर येथील छावा प्रतिष्ठानतर्फे रक्तदान घेण्यात आले तर मध्यवर्ती मंडळाने केदारनाथ मंदिराचा देखावा केला गांधी चौक येथील छावा







ग्रुपने मोठे प्रतिमा व देखावा उभारला आहे तर सह्याद्री प्रतिष्ठानने आई तुळजाभवानी हा देखावा उभा केला आहे. हिंदवी प्रतिष्ठान यांनी सागरी आरमार उभारले आहे. छत्रपती प्रतिष्ठानने अति अशा रोड महाराजांचा पुतळा उभा करून उपनगराध्यक्ष शिवतेसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते पूजन केले आज सकाळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी प्रत्येक मंडळाला भेटी दिल्या व मराठा सेवा संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहून महाराजांना अभिवादन केले यावेळी आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, शिवतेज मोहिते-पाटील उपस्थित होते. तर सायंकाळी अकलूज मधील महिलांनी शिवसृष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मसोहळा साजरा केला नगराध्यक्ष रेश्मा आडगळे डॉक्टर स्वयंप्रभा मोहिते-पाटील व नगरपरिषदेच्या सर्व सदस्य उपस्थित होते.

### शिवप्रेमी मंडळ, सांगोला

सांगोल्यात शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शिवप्रेमी मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शिवतीर्थ येथे मंगळवार दि.१७ फेब्रुवारी रोजी शिवमंच पुजन व श्री शिव मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. बुधवार दि.१८ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सवाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन करण्यात आले. तसेच कोल्हापूर येथील शिवशाहीर दिलीप सावंत यांचा पोवाडा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व रात्री ११.४५ वा. शिवजन्म पाळणा सोहळा, स्फूर्तीगीते आयोजित करण्यात आली होती.

गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी स.६ वा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. स.८ वा. प्रतिमेस दुग्धाभिषेक व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्थानिक क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने स.९ वा. सांगोला शहर व तालुक्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेल्या गुणवंत खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स.१० वा. शहरातून सर्व महापुरुषांना अभिवादन करत रॅली काढण्यात आली. या रॅलीत छत्रपती शिवाजी महाराज यांची आकर्षक भव्य मूर्ती, हलगी पथक, लेझीम पथक, नाशिक ढोल, पारंपरिक वेशातील मावळे, घोडे, उंट, दांडपट्टा व मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.



शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी सायं.८ ते ११ वा.पर्यंत भूपाळी ते भैरवी हा कार्यक्रम, रविवार दि.२२ फेब्रुवारी रोजी सायं.८ ते ११ वा.पर्यंत रायबा हेच का आपले स्वराज्य हा कार्यक्रम तसेच सोमवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायं.५ वा. शिवतिर्थ येथून छत्रपती शिवरायांचा पारंपारिक पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



### दुधनी जि.प. केंद्र शाळा, अक्कलकोट

तालुक्यातील दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत कलशेट्टी व इतर मान्यवरांच्या हस्ते हे पूजन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दुधनी जन्मभूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिवकुमार झळकी हे होते. मुख्याध्यापक पोमू राठोड यांनी प्रास्ताविक केले.

सोहळ्याला शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेंद्र इंगळे, सैदप्पा झळकी, महेदीमिंया जिडगे, अंजली गुंजोटे, विलास पोतदार, राम पुजारी, दाऊद नदाफ, उमाकांत आळंद, श्रीशैल चिंचोळी, जगदीश चिंचोळी, भगवान बनसोडे, शिवा हौदे, रघुनाथ बसवनकेरी यांच्यासह सुजाता कांबळे, सुसलाबाई बिल्लाड, मल्लम्मा मोडलकर, प्रियंका हौदे उपस्थित होते. सूत्रसंचालन रविकुमार कोरगांवकर व संजीवकुमार बेण्णेसूर यांनी केले. तर आभार सुहास पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पोमू राठोड, श्रीशैल मलगण, रविकुमार कोरचगाव, संजीवकुमार बेण्णेसूर व अंजली गुंजोटे यांनी परिश्रम घेतले.

### वखारिया विद्यालय, बार्शी



वखारिया विद्यालयात छत्रपती शिवरायांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख सहशिक्षक रमेश लंकेश्वर यांनी जयंती उत्सव समारंभाचे आयोजन केले होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर आणि कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विद्यालयातील शिक्षक शंकर शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले.

प्रास्ताविक शिक्षक डी. डी. राऊत यांनी केले. याप्रसंगी डॉ. प्रशांत काशीद उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिलेल्या अतुल राठोड यांचा क्रीडाशिक्षक महाले यांनी तर रेवणसिद्ध दुलंगे यांचा राऊत यांनी सत्कार केला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन चरित्रावर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आभार शिक्षक अनिल वैद्य यांनी मानले



### शिवजयंती महोत्सव समिती, पिलीव

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिलीव येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती निमित्त माजी आमदार राम सातपुते यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

यावेळी पिलीव गटाचे जिल्ह्य परिषद सदस्य चंद्रकांत जाधव, माजी जिल्ह्य परिषद सदस्य गणेश पाटील, माळशिरस तालुका मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने, पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे, शहराध्यक्ष प्रमोद भैस, सोनु पराडे, अंकुश भैस, राहुल भैस, ॲड. सत्यजित गलांडे, निसार मुलाणी, सनी घोंगडे, आनंता जामदार, ॲड. अजय घाटे, चैतन्य देशमुख, संजय पाटील, अतुल नष्टे, प्रवीण वाघमारे, बोडरे, सहहायक पोलीस निरीक्षक जानकर व सेवानिवृत्त मेजर जय गलांडे यांच्या हस्ते आरती करण्यात आली .यावेळेस हवालदार पंडित मिसाळ उपस्थित होते.

# बार्शीत शिवमय वातावरणात शिवजयंती उत्सव साजरा

## 'भक्ती आणि शक्ती'चा ४० फुटी फुलांच्या भव्य देखाव्याने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२० फेब्रुवारी-**

अखंड हिंदुस्थानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बार्शीत विविध मंडळांच्यावतीने दिमाखदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**'भक्ती-शक्ती'चा अद्वितीय देखावा**

बार्शी शहरात शिवजयंतीनिमित्त यंदाही विशेष आकर्षण ठरले ते फुलांच्या सजावटीतून साकारलेल्या 'भक्ती आणि शक्ती' या ४० फूट उंच भव्य देखाव्याचे. यंदाही श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. मधुकर बाबुराव मोहिते यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू संग्राम दिलीप मोहिते यांच्या स्वखर्चातून आणि संकल्पनेतून श्री शिवाजी महाविद्यालयासमोरील अश्वारुढ पुतळा परिसरात ४० फूट उंचीचा 'भक्ती आणि शक्ती' हा भव्य देखावा साकारण्यात आला. हा देखावा संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवराय यांच्या ऐतिहासिक भेटीवर आधारित होता. सुमारे दीड टन विविध प्रकारच्या फुलांचा वापर करुन हा देखावा उभारण्यात आला. धनंजय डेकोरेटर्सचे सागर वाघमारे व त्यांच्या २५ कलाकारांच्या चमूने सलग तीन दिवस परिश्रम घेत हा देखावा साकारला आहे. मागील आठ वर्षांपासून मोहिते परिवाराच्यावतीने शिवजयंतीनिमित्त वेगवेगळ्या विषयांवर आधारित फुलांचे देखावे सादर करण्याची परंपरा जपली जात आहे.



### सामाजिक उपक्रमांची रेलचेल

शिवजयंतीनिमित्त शहरात अनेक मंडळांकडून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान, आरोग्य शिबिरे, शिवभोजन, रक्तदान शिबिरे आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. अनेक मंडळांकडून आकर्षक पद्धतीची सजावट, विद्युत रोषणाई, आकर्षक आतिषबाजी केलेली पाहायला मिळाली. अनेक शाळांनी विद्यार्थ्यांसह रॅली काढून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. अनेक मंडळांकडून ढोल पथकांच्या गजरात आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात शिवप्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर ग्रामीण भागातही गावोगावी शिवप्रतिमेचे पूजन करुन शिवजयंती साजरी करण्यात आली. अनेक ठिकाणी सामाजिक उपक्रम, शिव व्याख्यातांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

### मध्यरात्री पाळणा गाऊन जन्मोत्सव

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी रात्री बारा वाजता शहरातील विविध भागांत महिलांनी पारंपरिक वेशभूषा करुन, पाळणा गाऊन पाळण्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची छोटी मूर्ती ठेवून शिवजन्मोत्सव साजरा केला. युवकांनी नगरपरिषदेच्या परिसरातील शिवसृष्टी व श्री शिवाजी महाविद्यालया जवळील छत्रपती शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले.

### डीजेमुक्त आणि शांततेत उत्सव

यंदाची शिवजयंती डीजेमुक्त साजरी करण्यात आली. पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेत कडक बंदोबस्त ठेवला होता. मंडळांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करुन उत्सव शांततेत पार पाडला. तसेच बुधवार दि. १८ रोजी सायंकाळी मध्यवर्ती शिवजयंती मंडळ व जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने बार्शीतील पत्रकार मंडळ, वकील संघ, डॉक्टर मंडळी व पोलीस बांधव यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

**पारंपरिक पालखी सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद**

अठरापगड जातीतील मावळ्यांच्या वेशभूषेत सजलेले युवक, अश्वारूढ ध्वजधारी मावळे, अश्वारुढ शिवरायांचे साकारलेले रुप, सनई-चौघड्यांच्या गजरात निघालेली बैलगाडी, नऊवारी साडीत महिला, पारंपरिक पोशाखातील पुरुष व लहान मुले-मुलींचा उत्साही सहभाग यामुळे सोहळ्याला ऐतिहासिक स्वरुप प्राप्त झाले. पालखी मार्गावरील अनेक ठिकाणी पालखीसाठी रांगोळ्या काढून, पायघड्या घालून, फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. काही ठिकाणी पाणी, सरबत, मिठाई, फळे, दूध वाटप आदी उपक्रम विविध सामाजिक संघटनांकडून राबविण्यात आले.

